# ई - पोलीस पत्रिका

*दि ३१/१०/२०१९* *अनु.क्र.२१६*

## (अमरावती शहर पोलीसांची २०१९ ची उद्दिष्टे)

- *जागरूक व तत्पर पोलीस.*
- *नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.*
- *उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.*
- *महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.*
- *जातीय सलोखा वाढविणे.*
- *संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.*
- *रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.*
- *पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.*
- *आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.*
- *"सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू*

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/ रजा

**१.क्रमांक :पोआअ/आस्था-रजा/अ.र.रोखीकरण /७ पे.सुधारी /७९६३/२०१८ अमरावती दि.१९.१०.२०१९**

### आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस हवालदार हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे शासकीय सेवेतून नियत वयोमानाने सेवानिचृत्त/ स्वेच्छा सेवानिवृत मयत झ ााल्याने त्यांचे सेवासमाप्तीच्या दिनांकास त्यांच्या रजा लेख्यात शिल्लक असलेल्या एकुण अर्जित रजेचे ( कमाल मर्यादा ३०० दिवस मर्यादेत) रकाना क्र.५. मध्ये नमुद विध्यमाण वेतनाप्रमाणे रोखीकरण करण्यास मंजुरी देण्यात आलेली होती.

शासन अधिसुचना वित्त विभाग ,क्रमांक वेपुर २०१९/प्र.क्र.१/सेवा-९ दि.३०.०१.२०१९ तसेच शासन परिपत्रक ,वित्त विभाग ,क्र. वेपुर-२०१९/ प्र.क्र.८ /सेवा -९ दि.२०.०२.२०१९ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना सुधारीत वेतन संरचना लागू करण्यात आलेली आहे. सदर पोलीस कर्मचारी यांचे वेतन पडताळनी पथक , अमरावती यांचे मार्फत वेतन पडताळणी करण्यात आली आहे.त्यामुळे खालील नमुद सेवानिवृत्त /स्वेच्छा सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी त्यांच्या सेवा समाप्तीच्या दिनांकास रजा लेख्यात शिल्लक असलेल्या एकुण अर्जित रजेचे ( कमाल मर्यादा ३०० दिवस मर्यादा ) स्तंभ ७ मध्ये दर्शविलेल्या सुधारीत देय वेतन संरचणेनुसार रोखीकरण करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **पोलीस कर्मचाऱ्याचे नाव पदनाम व ब.न.** | **सेवा समाप्तीचा दिनांक** | **पुर्वीचा रोखीकरण मंजुरी आदेश क्र.दिनांक** | **शिल्लक अर्जित रजा** | **विध्यमान वेतन व ग्रेड पे** | **सुधारीत वेतन संरचना** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | श्री.तुकाराम फत्तूजी राठोड, सपोउपनि/२७ | नियत वयो.सेनि. दि.३०.०६.२०१८ | जा.क्र.८९८५/१८, दि.२०.०८.२०१८ | ३०० | शेवटचे वेतन बँड १३,८७०/- ग्रेड.पे.२,८००/- | वेतन स्तर एस -१० रु.४२,८००/- |
| ०२ | श्री.राजू नामदेवराव मालगे, सपोउपनि/५४६ | नियत वयो.सेनि. दि.३१.०१.२०१९ | जा.क्र.१६७३/१९ दि.०१.०३.२०१९ | ३०० | शेवटचे वेतन बँड १४,३४०/- ग्रेड.पे.२,८००/- | वेतन स्तर एस -१० रु.४४,१००/- |
| ०३ | श्री.भानुदास महादेवराव उके ,सपोउपनि/८१८ | स्वेच्छा सेवानिवृत्त दि.२८.०२.२०१९ | जा.क्र.२५६९/१९, दि.२९.०३.२०१९ | २९ | शेवटचे वेतन बँड १४,०१०/- ग्रेड.पे.२,८००/ | वेतन स्तर एस -१० रु.४४,१००/ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | - | - |
| ०४ | श्री.रमेश संपतराव तायवाडे, सपोउपनि/३८ | नियत वयो.सेनि. दि.३१.०३.२०१९ | जा.क्र.३३८५/१९, दि.०३.०५.२०१९ | ३०० | शेवटचे वेतन बँड १५,४३०/- ग्रेड.पे.२,८००/- | वेतन स्तर एस -१० रु.४६,८००/- |
| ०५ | श्री.अरविंद महादेवराव डांगे,पोहवा/५४८ | नियत वयो.सेनि. दि.३०.०४.२०१९ | जा.क्र.४४८८/१९, दि.१७.०६.२०१९ | ३०० | शेवटचे वेतन बँड १४,२४०/- ग्रेड.पे.२,५००/- | वेतन स्तर एस -९ रु.४३,६००/- |
| ०६ | श्री.दिपक राजेरामजी गाडे, पोहवा/७३१ | नियत वयो.सेनि. दि.३०.०६.२०१९ | जा.क्र.६९५८/१९, दि.११.०९.२०१९ | २७८ | शेवटचे वेतन बँड १३.२३०/- ग्रेड.पे.२,५००/- | वेतन स्तर एस -९ रु.४१,१००/- |
| ०७ | श्री.रमेश नारायनराव विघ्ने, पोहवा/७३३ | नियत वयो.सेनि. दि.३१.०७.२०१९ | जा.क्र.६९५८/१९, दि.११.०९.२०१९ | ३०० | शेवटचे वेतन बँड १४,१८०/- ग्रेड.पे.२,५००/- | वेतन स्तर एस -९ रु.४६,६००/- |

**उपरोक्त पोलीस कर्मचारी यांना विद्यमान वेतन बँड व ग्रेड वेतन आणि सुधारीत वेतन संरचना यामधील रोख सममुल्य फरकाची रक्कम देय राहील.**

**ooo**

**२.क्रमांक :पोआअ/पशा-१/रजा रोखीकरण-पो.अधि./८०२०/२०१९अमरावती दि.२३.१०.२०१९**

**आदेश**

महाराष्ट्र शासन गृह विभाग निणर्य क्रमांक एलव्हीई/२००२/प्र.क्र./५६४/पोल-५ ब/दिनांक २७.०२.२००४ अन्वये खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे विनंतीवरुन त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे **वित्तीय वर्ष २०१९ -२०२० करीता १५ दिवस अर्जीत रजेचे प्रत्यार्पण मंजुर करण्यात येत आहे.**

| **अ.क्र.** | **पोलीस अधिकाऱ्याचे नाव व पदनाम** | **नेमणुक** | **रजेचा प्रकार** | **वित्तीय वर्ष** |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| ०१ | पोनि. सिमा दाताळकर | पो.स्टे.राजापेठ , अमरावती शहर | १५ दिवस अर्जीत रजेचे प्रत्यार्पण | २०१९-२०२० |
| ०२ | पोनि.सलीमाखाँ इतबारखाँ | पो.स्टे.नियंत्रन कक्ष | १५ दिवस अर्जीत | २०१९-२०२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | तडवी | ,अमरावती शहर | रजेचे प्रत्यार्पण | |
| ०३ | सपोनि.प्रशाली दादाराव काळे | महिला सेल ,अमरावती शहर | १५ दिवस अर्जीत रजेचे प्रत्यार्पण | २०१९-२०२० |
| ०४ | पोउपनि.जी.एस.काठेवाडे | पो.स्टे.खोलापुरी ,गेट अमरावती शहर | १५ दिवस अर्जीत रजेचे प्रत्यार्पण | २०१९-२०२० |
| ०५ | पोउपनि.अ.ता.चवरे | बिनतारी संदेश ,अमरावती शहर | १५ दिवस अर्जीत रजेचे प्रत्यार्पण | २०१९-२०२० |

०००

**३.क्रमांक:-पोआअ/आस्था-८/स्थावर मालमत्ता परवानगी/८०१७/२०१९ अमरावती दि.२३.१०/२०१९**

**संदर्भ** - पोशि/१५६७ दानिश इकबाल अब्दुल लतीफ ,नेमणूक पो.स्टे.राजापेठ ,अमरावती शहर यांचा दि.१७.०७.२०१९

## आदेश

पोलीस आयुक्तालय अमरावती शहर आस्थापनेवरील पोशि/ १५६७दानिश इकबाल अब्दुल लतीफ ,नेमणूक पो.स्टे.राजापेठ ,अमरावती शहर यांनी स्वतःच्या नावाने प्लॉट ही स्थावर मालमत्ता खरेदीव्दारे संपादीत करण्यांची परवानगी मिळणेबाबत, त्यांचा अर्ज सादर केला असुन स्थावर मालमत्तेचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | स्थावर मालमत्ता धारकांचे नाव व पत्ता | श्री जमील अहमद खान वय -५८ वर्ष , रा पॅराडाईज कॉलनी , अमरावती.. |
| २ | स्थावर मालमत्तेचे वर्णन | मौजा-नवसारी (श्रीनाथ विहार )प्रगने नांदगाव पेठ ता.जि.अमरावती येथील शेत स.न.६२ मधील हेक्टर-५, आर -५७ जमीन वि. जिल्हाधिकारी साहेब अमरावती त्यांचे फाईलवरील रा.मा.क्र.एन.ए.पी. ३४ /नवसारी ०८./२०००-२००१ निकाल तारीख २७.०९.२००० नुसार लेआउट कन्वहर्शन मंजुर झालेल्या जागेतील मंजुर नकाशा प्रमाणे प्लॉट क्र.२६-बी ( सव्वीस बी) याची साईज ११मीटर x १८ मीटर असुन त्याचे एकुण क्षेत्रफळ १९८ चौ .मिटर आहे . पैकी रेकॉर्ड आफ राईट प्रमाणे माझ्या मालकीचा व ताब्यातील पु.प. वाटनीचा उत्तरेकडील भाग याची साईज ५.५. मिटर x १८ मिटर यांचे एकुण क्षेत्रफळ ९९.०० चौ मिटर चौ.फुट (चौ.फुट १०६५.५.)आहे. |
| ३ | स्थावर मालमत्ता खरेदी व्दारे संपादित करण्यासाठी ठरविलेली किमंत | **रु.३,५२,०००/-** |
| ४ | स्थावर मालमत्ता खरेदीव्दारे संपादीत करण्यांस जमविलेल्या रक्कमेचा | रुपये. ३,००,०००/- पोलीस आयुक्त कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादीत |

| | | |
|---|---|---|
| | तपशिल | अमरावती यांचे कडुन (एकुण तीन लाख रुपये फक्त )<br>रुपये. ५२,०००/- वडीलाकडुन बक्षिस |
| ५ | शासकीय कर्मचाऱ्याने सदरची स्थावर मालमत्ता पुर्व परवानगी घेण्यापुर्वी खरेदी केली काय, कींवा पुर्व परवानगी घेवुन खरेदी करणार आहे, पुर्वीच खरेदी केली असल्यास खरेदीचा दिनांक | पुर्व परवानगी घेण्यापुर्वी खरेदी केली आहे. खरेदी दि.०२.०३.२०१९ |

पोशि/ १५६७दानिश इकबाल अब्दुल लतीफ ,नेमणूक पो.स्टे.राजापेठ ,अमरावती शहर यांना महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम १९७९ नियम क्रमांक १९ (२)(३) च्या तरतुदीनुसार पूतर्ता करत असल्याने त्यांना स्वःच्या नावाने उपरोक्त स्थावर मालमत्ता खरेदीव्दारे संपादीत करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

०००

**४.क्रमांक:-पोआअ/आस्था/वेनिलि/सु.वे.नि.२०१९/जोडपत्र/से.नि.२०१६ कर्म/७६९३/२०१९ अमरावती शहर दि.०९.१०.०१९**

**संदर्भ :-** **१**.शासन अधिसुचना वित्त विभाग क्रमांक वेपुर २०१९/प्र.क्र.१/सेवा-९,दि.३०.१.०१९
२.शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक वेपुर २०१९/प्र.क्र.८/सेवा-९,दि.२०.२.०१९

**आदेश**

शासन अधिसुचना वित्त विभाग क्र. वेपुर -२०१९/प्र.क्र.१/सेवा-९/ दि. ३०.०१.२०१९ तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग ,क्र.वेपुर -२०१९/प्र.क.८/ सेवा-९ , दि.२०.०२.२०१९ अन्वये दि.०१.०१.२०१६ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने सुधारीत वेतन संरचना लागु करण्यात आलेली आहे.

त्याअनुषगाने पोलीस आयुक्त कार्यालय अम श.येथील कर्मचारी यांचे सुधारीत वेतननिश्चिती करिता सदर अधिसुचनेतील नियम ६ अन्वये जोडपत्र -३ मधील नमुण्यात लेखी विकल्प व वचनपत्र या कार्यालयात सादर केल्याने त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ मधील तरतुदीनुसार सोबतच्या जोडपत्रात दर्शविल्या प्रमाणे दि.१.१.२०१६ पासुन सुधारीत वेतन निश्चिती करण्यात आलेली आहे.

संदर्भीय अधिसुचना अन्वये पोलीस कर्मचारी यांचे पदानुसार खालील प्रमाणे अधिक विशेष वेतन देय राहील.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **म.ना.से.वेतन नियम २०१९ अन्वये दि.१.१.२०१६ पासुन देय विशेष** |
|---|---|---|

| | | वेतन |
|---|---|---|
| १ | पोलीस हवालदार(निश्स्त्र) **(आयुधिक कर्मशाळा येथील पोलीस हवालदार वगळुन)** | विशेष वेतन रु.७५०/- |
| २ | पोलीस नाईक (चालक)मो.प. | विशेष वेतन रु.२००/- |
| ३ | पोलीस शिपाई | विशेष वेतन रु.७५०/- |

| **अ.क्र.** | **पदनाम** | **ब.न.** | **नाव** | **नियत वयो/से.नि.स्वेच्छा.से.नि. झाल्याचा दिनांक** |
|---|---|---|---|---|
| १ | पोना | ४०७ | फकीरा नामदेव सरकटे | से.नि.३०.०६.२०१६ |

सदर सुधारीत वेतन निश्चिती ही वेतन पडताळनी पथक , अमरावती यांचे अंतिम पडताळनीचे अधिन राहुन करण्यात आलेली आहे.अशा पथकाडुन होणाऱ्या तपासणीनुसार केलेल्या वेतन निश्चितीमध्ये बदल अपेक्षित असल्यास /झाल्यास ( वेतन पुर्ननिश्चितीमुळे) पुर्वीच्या वेतन निश्चितीप्रमाणे ज्यादा अदा झालेले वेतन व भत्ते त्याचप्रमाणे अदा झालेल्या फरकाच्या जादा रकमेची वसुली करण्यात येईल.

सदर कर्मचारी यांना थकबाकी प्रदान करण्याची कार्यवाही वेतन लिपीक यांनी शासन अधिसुचना वित्त विभाग , क्रमांक वेपुर २०१९ /प्र.क्र.१/सेवा-९, दि.३०.०१.२०१९ तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि.२०.०२.२०१९ नुसार करावी.

०००

**५.क्रमांक :पोआअ/विचौ-१/विचौ/अंतिम आदेश/पोशि/-८०६ सरकटे/७८४८/२०१९अमरावती दि.१५.१०.२०१९**

**आदेश**

**कसुरदाराचे नाव :-** पोशि/८०६ बाळु लक्ष्मण सरकटे ,पोलीस मुख्यालय,अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही पोलीस मुख्यालय अमरावती शहर येथे नुमणुकीस असुन , आपण प्रकृतीचे कारणास्तव वांरवार सन २०१५ ते २०१९ पावेतो रितसर रजेचा विनंती अर्ज सादर न करता अनधिकृतपणे एकुण ७०७ दिवस गैहजर राहुन पोलीस खात्याचे शिस्तीला बाधा पोहचवुन बेजबाबदारपणाचे बेशिस्त गैरवर्तणुकीचे कृत्य केले.त्यानंतर सन २०१९ मध्ये दिनांक

२४.०४.२०१९ पासुन आजपावेतो सतत अनधिकृतपणे गैहजर राहील्याने . आपल्या विरुध्द करण्यात आलेल्या विभागीय चौकशिमध्ये आपण दोषी असल्याचे निष्पन्न झाल्याने सन २०१५ ते २०१९ पावेतोचा आपल्या अनधिकृतपणे गैरहजेरीचा ७०७ दिवस त्रोटक कालावधि हा विनावेतन करण्यात आलेला आहे. आपणास या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोआअ/विचौ-१/विचौ/विचौ/पोशि/-८०६ सरकटे/२१७९/२०१९ दि.१६.०३..२०१९ रोजी आपल्या विरु ध्द विभागीय चौकशी मध्ये हजर राहणे कामी वि.चौ.अधिकाऱ्यानी वांरवार नोटीस देवुन सुध्दा आपण कोणतेही प्रतिसाद न देता वि.चौ.मध्ये हजर झाले नाही.त्यामुळे वि.चौ. अधिकारी यांनी साक्षीदार तपासुन आपणास नैसर्गिक न्यायतत्वाचे आधारावर भरपुर संधी देण्यात आली.परंतु आपण वि.चौ.मध्ये हजर न झाल्याने वि.चौ.अधिकारी यांचे समारोप अहवाल या कार्यालयास सादर केला.त्याचे अवलोकन केले असता अपणावर ठेवण्यात आलेले आरोप हे पुर्णतः सिध्द होत आहे.अशा प्रकारे आपण वरिष्ठाच्या आदेशाची पायामल्ली करुन व वरिष्ठाची पुर्व परवानगी न घेता तसेच रजा नियमाचे पालन न करता अनधिकृतपणे सतत गैहजर राहत असल्याचे विभागीय चौकशीमध्ये निष्पन्न झाले आहे.यावरुन असे दिसुन येते की, आपल्या वर्तनुकीमध्ये सुधारणा होत नसल्याचे आपल्या अभिलेखावरुन दिसुन आले आहे.त्यांच्या अहवलाशी आम्ही सहमत आहोत . तसेच आपणास वारंवार व टप्याटप्याने शिक्षा देवुनही आपल्या वर्तनुकीमध्ये काहीही एक सुधारणा झालेली नाही.त्याचप्रमाणे मद्यप्राशन करण्याचे सवयीचे असल्याने वैद्यकीय तपासणी अहवालावरुन दिसुन आले आहे.

या तुमच्या बेशिस्त, बेजबाबदार , निष्काळजीपना, हलगर्जीपना तसेच कर्तव्यच्युतीच्या गंभीर कसुराबददल तुम्हास **शासकीय सेवेतुन सक्तीने सेवानिवृत्त (Compulsopry R etirement)** का . करण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये देण्यात आली होती. सदर नोटीस तुम्ही दिनांक ०३.०९.२०१९ रोजी स्विकारुन त्यावरील स्पष्टीकरण अद्यापपावेतो सादर केले नाही. त्या अनुषंगाने तुम्हास दि.०७.१०.२०१९ व दि.१४.१०.२०१९ रोजी आज्ञांकीत कक्षेत अंतीम विवेचन ऐकुन घेण्याकरीता बोलाविले असता तुम्ही आमचे समक्ष हजर झाले नाही.यावरुन तुम्हास नमुद कसुरीबाबत काहीही एक सांगावयाचे नसुन का.दा.नो.मध्ये प्रस्तावित केलेल्या शिक्षा मान्य असल्याचे समजुन मी खालीलप्रमाणे एकतर्फी अंतिम शिक्षेचे आदेश पारीत करीत आहोत.

## अंतिम आदेश

पोशि/८०६ बाळु लक्ष्मण सरकटे ,यांना उपरोक्त कसुरी प्रकरणी महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ नियम क्रमांक ३ मधील (१) चे (१-अ) चे तरतुदीनुसार तुम्हास **शासकीय सेवेतुन सक्तीने सेवानिवृत्त (Compulsory Retirement)** करण्यात येत आहे.त्याचप्रमाणे म.ना.से.(रजा) नियम १९८१ मधील ६३ (६) चे तरतुदीनुसार तुमचा सदरचा गैहजर कालावधी **दिनांक २४.०४.२०१९ ते १५.१०.२०१९ पावेतो एकुण १७४ दिवस हा विनावेतन** करण्यात येत आहे .

आपण जर सदर शिक्षेमुळे व्यथित होत असाल तर सदरचा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत मा. अपर मुख्य सचिव , गृहविभाग, महाराष्ट्र शासन ,मत्रालय , मुंबई यांना योग्य त्या मार्फतीने अपिल अर्ज सादर करु शकतात.

**६.क्रमांक :- पोआअ/ विचौ-२/कसुरी गुन्हे नोंद/ सिसीटीएनएस/ अंतिम आदेश /कदम +५/७७९०/ २०१९ अमरावती शहर दिनांक .११.१०.२०१९**

## आदेश

**कसुरदाराचे नाव** :- पोउपनि सुलभा राऊत ,पो.स्टे.नागपुरी गेट, अमरावती शहर

**थोडक्यात कसुरी :-**

आपण वर आपल्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नेमणुकीस असुन ,आपणास मा.अप्पर पोलीस महासंचालक ,रा.गु.अ.कें.,महाराष्ट्र राज्य,पुणे तसेच आयुक्तालयाचे मा.वरिष्ठअधिकारी यांनी वेळोवेळी गुन्हयाची संपुर्ण माहीती सिसीटीएनएस प्रणालीमध्ये वेळेचे वेळी अद्यावत करुनच मा. न्यायालयात अंतिम अहवाल / दोषारोप पत्र न्यायार्थ सादर करण्याबाबत आदेशीत असतांना सुध्दा आपण खालील प्रमाणे महीला विरुध्द अत्याचारांच्या दाखल गुन्हयाचे दोषारोप पत्र सिसीटीएनएस प्रणालीमध्ये अद्यावत न करता परस्पर दोषारोप पत्र / अंतिम अहवाल न्यायालयात सादर केलेला आहे. त्यामुळे सिसीटीएनएस प्रणालीमधे या गुन्हयाची माहिती तपासावर प्रलंबित असल्याचे दिसुन येत आहे.

आपणास वेळोवेळी तोंडी /लेखी सुचना देवुन सुध्दा तसेच आयटीएसएसओ प्रणालीचे युजर आयडी व पासवर्ड तयार करुन देण्यात आले असुन त्याबाबत आपणास सिसीटीएनएस कक्षातर्फे प्रशिक्षीत करण्यात सुध्दा आले होते. तरी आपण जाणीवपुर्वक वरिष्ठांचे निर्देशांकडे दुर्लश केल्याचे दिसुन आले आहे. त्यामुळे घटकाचे कामगिरीवर परिणाम झालेले आहे.

| **अ.क्र.** | **पो.स्टे** | **अप.क्र.व कलम** | **तपासी अधिकारी** | **सि.सी.क्रमांक व दिनांक.** | **CCTNS सद्यास्थिती** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | गाडगे नगर | १७/१८ कलम ३७६ (फ)(१) भादंवि कलम ४,६ पोक्सो | शुभांगि मयतकार | १५४/२०१९ दिनांक १०.०७.२०१९ | तपासावर |
| **२** | खोलापुरी गेट | ९३/१८ कलम ३७६ (२)(१) भादंवि कलम ४,६ पोक्सो | गजानन काठेवाडे | १६१/२०१९ दिनांक १२.०७.२०१९ | तपासावर |
| **३** | नागपुरी गेट | ३६/१९ कलम ३७६ ,३७६(A )(B),५०६ भादंवि कलम ४,८,१२ पोक्सो | सुलभा राऊत | ०९/२०१९ दिनांक ०२.०६.२०१९ | तपासावर |
| **४** | नांदगाव पेठ | १३७/१९ कलम | सुजाता बन्सोड | १७०/२०१९ | तपासावर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३६३,३७६ (२ )(एन) भादंवि कलम ४,६ पोक्सो | | दिनांक २०.०७.२०१९ | |
| **५** | वलगाव | १९२/१९ कलम ३७६ (A )(B),भादंवि कलम ६ पोक्सो | मोहन कदम | १४४/२०१९ दिनांक ०६.०७.२०१९ | तपासावर |
| **६** | बडनेरा | ३९६/१९ कलम ३७६ (३),३२४,३४,भादंवि कलम ४, पोक्सो | मम ता अफुने | १२७/२०१९ दिनांक ०१.०७.२०१९ | तपासावर |

अशाप्रकारे आपण शिस्तबध्द पोलीस खात्यात नेमणुकीस असतांना सुध्दा उपरोक्त प्रमाणे निर्गती आलेल्या गुन्हयाची सिसीटीएनएस प्रणालीमधे अद्यावत न करता परस्पर दोषारोप पत्र /अंतिम अहवाल न्यायालयात सादर केले.या आपल्या बेशिस्तपणाच्या व गैरवर्तनुकीच्या कसुरीबददल आपणास तुम्हास १,०००/- रु आर्थिक दंड का करण्या येवु नये . याबाबत संदर्भीय आदेशान्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. व सदर नोटीस आपण स्विकारली असुन आपले स्पष्टीकरण सादर केले असता ते अंशतः समाधानकारक मिळुन आल्याने का.दा.नो. मधील प्रस्तावित शिक्षेत बदल करुण खालील प्रमाणे अंतिम शिक्षेचे आदेश पारीत करीत आहेत.

**अंतिम आदेश**

उपरोक्त कसुर प्रकरणी पोउपनि सुलभा राऊत ,पो.स्टे.नागपुरी गेट अमरावती शहर यांना महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ नियम क्रमांक ३ मधील (२) चे (ii) तरतुदी नुसार **सक्त दाकीद** हि शिक्षा देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ च्या नियम ७ अन्वये सदर आदेशाविरुध्द अनिल अनुज्ञेय नाही.

०००

**( डी.बी.राठोड)**
प्रशासकिय अधिकारी
पोलीस आयुक्त,अमरावती शहर करिता

प्रत,

पत्रव्यवहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक , आस्थापना शाखा/ .सीसीटीएनएस कक्ष यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता